International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.6 July – Aug 2021

# न्याय , न्यायालय आणि जनता - एक चिकित्सा

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
**संशोधक विद्यार्थी**
**आदर्श महाविद्यालय, हिंगोली**

**प्रस्तावना**

न्यायव्यवस्था हे लोकशाहीचा आधारस्तंभ आहे न्यायव्यवस्था हे शासनसंस्थेचे तिसरे महत्वाचे अंग आहे. संघराज्यीय धारकामधील तंटे शासन व जनता यामधील तंटे तसेच जनतेमधील आपआपसातील तंटे सोडवणे हे न्यायवाव्स्थेचे प्रमुख कार्य आहे तसेच घटनात्मक तरतुदीचा अर्थ लावण्याचे कार्य न्यायालयामार्फत केले जाते. भारतीय आध्यात्माचे आवलोक अर्पण केले असता ते केवळ एक अध्यात्मिक ग्रंथ नाही तर ते एक न्यायव्यवस्थेवर आधारित एक पुस्तक आहे असे म्हणले तरी वावगे ठरणार नाही उदा. महाभारत या ग्रंथामध्ये पांडव आणि कौरव यांच्यामधील राज्य वाटून घेण्यासंदर्भात तो वाद होता नंतर त्या करणांवरून आपसात युद्ध झाले तेच आजच्या न्यायव्यवस्थेच्या भाषेत सांगायचे झाल्यास दिवाणी वाटणीचा दावा व त्यानंतर फौजदारी स्वरूपाच्या कार्यवाही आपणास म्हणता येईल त्याच प्रमाणे रामायण या आध्यात्मिक ग्रंथाचे आजरोजी न्यायव्यवस्थेच्या भाषेत विश्लेषण करावयाचे असल्यास माता सीतेचे रावणाने केलेले अपहरण म्हणजेच फौजदारी स्वरुपाची अपहरनाची केस होती असे म्हणता येईल भारतीय अध्यात्मापासुन स्वतःचा हक्क आणि न्याय मिळवण्याकरिता वेगवेगळया स्वरूपाचे प्रयत्न केले गेले. भारत देश आधीपासूनच न्यायप्रिय देश होता व आहे याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे माता सीतेला द्यावी लागलेली अग्नी परीक्षा.

पुढे आपल्या देशातील राजे, चावडी, पंचायती च्या माध्यमातून लोकांना त्यांच्यातील असले वाद मिटविण्याकरिता प्रत्यक्ष समोर उभे करून सदर वाद मिटविण्याकरिता प्रयत्न केले जायचे. परंतु आध्यात्मिक ग्रंथ व आपले भारतीय राजे जे न्यायदान करायचे त्यावेळी गुन्ह्याच्या स्वरूपावरून त्याचे मापदंड व शिक्षेचा प्रकार अथवा दंडाचे लिखित स्वरूप नव्हते आता मात्र प्रत्येक स्वरूपाच्या गुन्ह्याची शिक्षा व दंड याचे एक लिखित कायद्याच्या रूपात करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे**

1) भारतीय न्यायव्यवस्थेचा इतिहासाचा आढावा घेणे.
2) भारतीय व्यवस्थेची आज रोजीची परिस्थिती तपासणे.
3) भारतीय व्यवस्थेला आणखी बलशाही बनविण्याकरिता आवश्यक घटक सुचविणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासाचे दोन भागात वर्णन आपणास खालील दोन प्रकारात वर्णन करता येईल.

**१. परकीय आक्रमणापूर्वी**

भारतामध्ये परकीय आक्रमणापूर्वी पंचायती आधारे गावातील तंटे आणि सर्व स्वरूपाचे वाद मिटविले जायचे. यामध्ये बऱ्याच वेळा पीडितावर अन्याय व्हायचा कारण शिक्षेचे मापदंड ठरलेले नसायचे. आजही देशाच्या काही भागात पंचायती आधारे गावातील तंटे आणि वाद मिटविले जातात. परंतु कधी पीडितावर तर आरोपी समजल्या जाणाऱ्या व्यक्तीवर खूप मोठा अन्याय होताना दिसून आले आहे. उदा. उत्तर भारतात आजही पंचायत भरविली जाते. बऱ्याच वेळेस मुला मुलींच्या प्रेमविवाह करायचा प्रयत्न केल्यामुळे मुला मुलींची नग्न करून गावभर दिंड काढण्यात आल्याचे प्रकार घडले आहे. तर दुसरे उदाहरण एका पिढीतेने उच्च वर्णातील व्यक्तीने आपली छेड काढली हे पंचायतीसमोर सिद्ध करू शकले नाही. त्यामुळे पंचायती सर्व पंचलोकांनी तिच्यासोबत भोगन्याचा निर्णय दिला गेला. असे स्वरूपाचे न्यायदान हे गाव पंचायत मध्ये होताना दिसून येत आहे. त्याचे कारण एकच आहे पंच म्हणून ज्या व्यक्तीची निवड एकदा झाली. त्याची वंश पद्धतीने त्यावर नेमणूक होताना दिसते. या वारसांना कोणत्याही स्वरूपाचे कायदे ज्ञान नसल्यामुळे ही पद्धत कालबाह्य ठरली आहे. परंतु आजही उत्तर भारतामध्ये काही राज्यात ही पद्धत अस्तित्वात आहे.

**२. परकीय आक्रमणानंतर न्यायव्यवस्था**

आपल्या भारत देशावर अनेक परकीय आक्रमणे झालीत त्यातील न्यायव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे कार्य (इंग्लंड) ब्रिटिशांनी केले. आपण आज रोजी न्यायव्यवस्था स्वीकारली ती पूर्णतः इंग्लंड कडून स्वीकारले आहे. आपण संघराज्यीय शासन व्यवस्था जरी स्वीकारलेली असेल परंतु न्यायव्यवस्था मात्र एकेरी स्वरूपाची स्वीकारलेली असून एकाच श्रुंखलेन बांधली गेलेली आहे.

***<u>आजची भारतीय न्यायव्यवस्थेची परिस्थिती</u>***

इंग्लंड प्रमाणे आहे बहुतांश कायदे आधी त्यांनी आपल्याला दिलेला एक बक्षीस रुपये ठेवा आहे. पंचायतीनंतर न्यायालय त्यामुळे प्रत्येक स्वरूपाच्या गुन्ह्याच्या शिक्षणा किंवा वादाला एक लिखित स्वरूपाचा मापदंड आले आहे आणि न्यायालय दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यावर निर्णय देण्याचे एक महत्त्वाचे तत्व समोर आले त्याचबरोबर दिलेला निर्णय योग्य नाही आपल्यावर अन्याय झाला आहे असे दोन्ही पक्षापैकी एकाला वाटले तर त्या सदर निर्णयाविरुद्ध वरील न्यायालयात आपले द्वारे दाद मागू शकतो. ही संपूर्ण न्यायव्यवस्था ब्रिटिशांनी आपल्याला दिलेले Good Gift म्हणले तरी चालेल.
आजची न्यायव्यवस्थेची परिस्थिती

**1) निकाली निघणारी प्रकरण**

आजरोजी नविन दाखल होणाऱ्या गुन्ह्यामध्ये पोलीस प्रशासन व न्यायव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात ताण पडताना आपणास दिसून येत आहे. यामागे आपणास काही करणे सांगता येथील ती खालीलप्रमाणे :-

**A) कर्मचारी वर्गाची संख्या**

न्यायव्यवस्थेमध्ये आवश्यक तेव्हड्या प्रमाणात मनुष्यबळ यांची भारती नसल्याने न्यायव्यवस्थेतील कर्मचारी वर्गावर मोठ्या प्रमाणात ताण येत आहे एका संख्येकी आलेखा द्वारे सर्वोच्च न्यायालयात सुमारे 3 लाख पेक्षा जास्त प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेत. तर न्यायाधीशाची संख्या आज सर्वोच्च न्यायालयात 34 आहे.

पोलीस प्रशासनामध्ये एका विशिष्ट लोकसंख्येमागे पोलीस अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याची संख्या कमी प्रमाणात असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस प्रशासनावर मोठ्याप्रमाणात ताण पडताना दिसतो.

**2) नविन दाखल होणारे गुन्हे व प्रकरण**

आज देशात रोज वेगवेगळया प्रकारचे गुन्हे दाखल होताना पहावयास मिळन आहेत. त्याच बरोबर कौटुंबिक वादातून निर्माण होणारी प्रकरणे दाखल होण्याची संख्या न्यायालयात जास्त प्रमाणात आहे. कौटुंबिक वादातून दाखल होणारी प्रकरणे व निर्माण होणारी भग्न कुटुंब व्यवस्थेमुळे कुटुंबावर व त्यातील मुलांच्या विचारांवर दुष्परिणाम होऊन गुन्हेगारी वृत्ती लोकांमध्ये निर्माण होताना दिसुन येत आहे.

**3) कारागृह**

आज देशामध्ये असलेली सर्व प्रकारच्या कारागृहाच्या कैदी व चालू खटल्यातील आरोपीची संख्या कारागृहाच्या ठेवण्याच्या संख्ये पेक्षा दुप्पट ते अडीचपट असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे करागृह व्यवस्थापणावर सुद्धा परिणाम होताना दिसतो त्याचा सरकारच्या तिजोरीवर भार पडताना दिसतो.

**4) पोलीस प्रशासन**

पोलिस प्रशासनात असलेली उपलब्ध यंत्रना हि अपुरी असल्याने नविन दाखल होणारे गुन्हे यांचा तपास हा बऱ्याच वेळेस खंडित पडतो किंवा जाग्यावरूनच तपास कागदावर पूर्ण केला जातो. त्यामुळे खरोखर गुन्हा / अपराध घडला किंवा नाही हेच सिद्ध होत नाही. पोलीस प्रशासना बऱ्याच वेळेस केवळ कोणत्यातरी दबावामुळे किंवा लालसेमुळे खोटे गुन्हे दाखल करतात, त्यामुळे खरे पिढीत कोन हा प्रश्न निर्माण होतो.

**5) पिढीत, आरोपी, अर्जदार, गैरअर्जदार यांची स्थिती**

दाखल होणारे गुन्हे आणि प्रकरण यांचा पिढीत, आरोपी, अर्जदार, गैरअर्जदार या सर्व व्यक्तीवर परिणाम होऊन त्यांचे आर्थिक नुकसान, कुटुंब व्यवस्थेवर परिणाम होतो त्याच बरोबर वेळ प्रसंगी जीवित हानीचे अनेक प्रकार घडलेले आपणासमोर आलेले आहेत.

**निष्कर्ष**

न्यायालयामध्ये कर्मचारी संख्या वाढवून लवकरात लवकर निकाली काढण्याचे प्रयत्न करणे उदा.न्यायालयाला स्वतःच्या आदेशाची अंमलबजावणी करिता अतिरिक्त अधिकारी वर्गाची नेमणूक करणे त्याच बरोबर न्यायालयाचे वारंट नोटीस बजावणीकरिता विशेष पोलीस अधिकारी न्यायालयाला देणे.उपविभागीय अधिकारी, तालुका न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर चालविली जाणारी दिवाणी स्वरूपातील लघु प्रकरणे हि प्रकरणे एखादे विशिष्ट विधी अधिकारी पद निर्माण करून त्यांच्या समोर सदरील प्रकाराने चालविण्यात यावी जेणे करून कायादीय गुंतागुंत वाढणार नाही आणि महसुली यंत्रणेवरील ताण कमी होऊन भ्रष्टाचारास आळा बसेल.

**संदर्भसूची**

1) Wikipedia
2) Indian Judiciary – G. K. Brar
3) न्यायालयीन प्रक्रिया – बसंती लाल बावेल
4) Law Judiciary and Governance – M. C. Sharma